भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/ २०११-१२/९०

आयडीएमडी.पीसीडी.५ /१४.०१.०३/२०११-१२ जुलै १, २०११

**अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सर्व अनुसूचित बँका (आरआरबी व एमएबी सोडून)**
**आणि अखिल भारतीय मुदत कर्जे व पुनर्वित्त देणाऱ्या संस्था**

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - ठेवींची प्रमाणपत्रे देण्यावरील मार्गदर्शक तत्वे**

नाणे बाजारातील संलेखांची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि निवेशकांना त्यांच्या लघु मुदतीच्या अतिरिक्त निधींच्या वापराबाबत अधिकतर लवचिकता देण्यासाठी, भारतात १९८९ मध्ये ठेव प्रमाणपत्रे (सीडी) देणे सुरु करण्यात आले. सीडी देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे, सध्या रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार नियंत्रित केली जातात.

२. बाजारात भाग घेणारांच्या व इतरांच्या संदर्भासाठी, ह्या विषयावरील सर्व विद्यमान मार्गदर्शक तत्वे/सूचना/निदेश एकत्रित करुन एक महापरिपत्रक तयार करण्यात आले आहे. येथे नोंद घेण्यात यावे की, सीडी देण्याबाबत लागु असलेल्या आणि जोडपत्रात समाविष्ट असलेल्या परिपत्रकांमधील सर्व सूचना/मार्गदर्शक तत्वे ह्या परिपत्रकात अद्यावत व एकत्रित करण्यात आली आहेत. डिलिट हे महापरिपत्रक आरबीआयच्या http://www.mastercirculars.rbi.org.in वेबसाईटवरही देण्यात आले आहे.

आपला,

(के.के.वोहरा)
प्रभारी मुख्य
महाव्यवस्थापक

सह.: वरील प्रमाणे

महापरिपत्रक - ठेवींची प्रमाणपत्रे
देण्यावरील मार्गदर्शक तत्वे

(सीडी)-जुलै १, २०११

**माहितीचे कोष्टक**


| **अनु क्र.** | **प्रकरण** | **पेज क्र.** |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | २ |
| २ | पात्रता | २ |
| ३ | एकूण रक्कम | २ |
| ४ | प्रचालनाचे किमान आकारमान व किंमत (डिनॉमिनेशन) | २ |
| ५ | गुंतवणुकदार | २ |
| ६ | परिपक्वता | ३ |
| ७ | सूट (डिस्काउंट)/कुपन रेट | ३ |
| ८ | राखीव निधीच्या आवश्यकता | ३ |
| ९ | हस्तांतरणीयता | ३ |
| १० | सीडींमध्ये व्यापार | ३ |
| ११ | कर्ज/पुनर्खरेदी (बाय-बॅक) | ३ |
| १२ | सीडींचा नमुना (फॉरमॅट) | ४ |
| १३ | सिक्युरिटीचा विचार | ४ |
| १४ | प्रमाणपत्रांबाबत प्रदान | ४ |
| १५ | बदली प्रमाणपत्रे देणे | ५ |

| | | |
|---|---|---|
| १६ | जमाखर्च | ५ |
| १७ | प्रामाणित बाजार कार्यरीती व कागदपत्रे ठेवणे | ५ |
| १८ | अहवाल पाठवणे | ६ |
| | परिशिष्ट | |
| | I. सीडींचा नमुना (फॉरमॅट) | ७ |
| | II. अहवाल नमुना | ८ |
| | III. व्याख्या | ९ |
| | परिशिष्टः एकत्रित परिपत्रकांची यादी | १० |

महापरिपत्रक - ठेवींची
प्रमाणपत्रे देण्यावरील
मार्गदर्शक तत्वे
(सीडी)-जुलै १, २०११

**१. प्रस्तावना**

ठेवीचे प्रमाणपत्र (सीडी) हा, दुसऱ्याला देता येण्याजोगा, मनी मार्केट संलेख असून तो, डिमॅट स्वरुपात, किंवा काही विशिष्ट काळासाठी एखाद्या बँकेत किंवा काही विशिष्ट काळासाठी एखाद्या बँकेत किंवा अन्य पात्र असलेल्या वित्तीय संस्थेत, काही विशिष्ट काळासाठी ठेवलेल्या निधीच्या विरुध्द दिलेल्या युजन्स प्रॉमिसरी नोटेच्या स्वरुपात दिला जातो. सीडी देण्याकरता असलेली मार्गदर्शक तत्वे सध्या, रिझर्व बँकेने वेळोवेळी सुधारित केलेल्या निरनिराळ्या निदेशांनी नियंत्रित असतात. आजपर्यंत केलेल्या सुधारणा समाविष्ट केलेली सीडी देण्यासाठी असलेली सर्व मार्गदर्शक तत्वे संदर्भासाठी खाली देण्यात आली आहेत.

**२. पात्रता**

पुढील संस्था सीडी देऊ शकतात - (१) अनुसूचित वाणिज्य बँका (प्रादेशिक ग्रामीण बँका व स्थानिक क्षेत्र बँका सोडून) (२) आरबीआयने विहित केलेल्या अंब्रेला लिमिटमध्ये (खालील परिच्छेद ३.२ मधील) असलेले लघु-मुदतीचे स्त्रोत उभे करण्यास आरबीआयने परवानगी दिलेल्या सर्व अखील भारतीय वित्तीय संस्था (एफआय)

**३. एकूण रक्कम**

३.१ त्यांच्या निधी आवश्यकतांवर अवलंबून, बँकांना सीडी देण्याचे स्वातंत्र्य आहे.

३.२ डीबीओडीने दिलेल्या व वेळोवेळी अद्यावत केलेल्या, रिसोर्स रेसिंग नॉर्म्सवरील महापरिपत्रकात विहित केलेल्या सर्वंकष अंब्रेला लिमिटमध्ये एखादी वित्तसंस्था सीडी देऊ शकते.

**४. प्रचालनाचे किमान आकारमान व किंमत (डिनॉमिनेशन)**

सीडीची किमान रक्कम रु १ लाख असावी, म्हणजे, एखाद्या एकमेव सबस्क्रायबरकडून स्वीकारावयाची किमान ठेव रु १ लाख असावी, व त्यानंतर रु १ लाखाच्या पाटीत असावी.

**५. गुंतवणुकदार**

व्यक्ती, निगम, कंपन्या, ट्रस्ट्स, फंड, संघ इत्यादींना सीडी देता येऊ शकते. अनिवासी भारतीयही (एनआरआय) सीडीमध्ये भाग घेऊ शकतात, परंतु केवळ अ-प्रत्यावर्तनीय रितीने व हे त्या प्रमाणपत्रवर स्पष्टपणे लिहिले जावे अशा सीडी, दुय्यम बाजारात दुसऱ्याच एका एनआरआयला एंडॉर्सकरुन दिल्या जाऊ शकणार नाहीत

**६. परिपक्वता**

६.१ बँकांनी दिलेल्या सीडींच परिपक्वताकाल, ही दिल्याच्या तारखेपासून ७ दिवसांपेक्षा व एक वर्षापेक्षा अधिक नसावा.

६.२ वित्तसंस्था मात्र एक वर्षापेक्षा कमी व ३ वर्षांपेक्षा अधिक नसलेल्या कालासाठी सीडी देऊ शकतात.

**७. सूट (डिस्काउंट)/कुपन रेट**

दर्शनी मूल्यावर डिस्काउंट देऊन सीडी देत येऊ शकते. बँका/वित्तसंस्थांना ही तरत्या दराच्या धर्तीवर सीडी देण्याची परवानगी आहे. मात्र तरता दर काढण्याची रीत ही वस्तुनिष्ट, पारदर्शक व बाजार - आधारित असावी. प्रचालन करणाऱ्या बँकेला/वित्तसंस्थेला डिस्काउंट/कुपन रेट ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे. तरत्या दरावरील सीडींवरील व्याजदर हा, एखाद्या पारदर्शक बेंचमार्कवरील प्रसार दर्शविणाऱ्या पूर्व नियोजित सूत्रानुसार, नियतकालिकतेने पुनर्निश्चित केला जावा. गुंतवणुकदाराला त्याबाबत स्पष्टपणे सांगितले जावे.

**८. राखीव निधीच्या आवश्यकता**

बँकांनि सीडीच्या प्रचालन किंमतीवर राख़ीव निधीच्या सुयोग्य आवश्यकता म्हणजे कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवणे गरजेचे आहे.

**९. हस्तांतरणीयता**

प्रत्यक्ष स्वरुपात असलेल्या सीडी, एंडॉर्समेंट व डिलिव्हरी करुन मुक्तपणे हस्तांतरणीय आहेत. डिमॅट स्वरुपात असलेली सीडी मात्र, इतर डिमॅट सिक्युरिटीज्ना लागु असलेल्या कार्यरीतीनुसार हस्तांतरित करता येते.

## १०. सीडींमध्ये व्यापार

सीडींमधील सर्व ओटीसी व्यापार, ते केल्याचा १५ मिनिटांच्या आत, एफआयएमएमडीए वर कळविले जावेत.

## ११. कर्ज/पुनर्खरेदी (बाय-बॅक)

बॅंका/वित्तसंस्था सीडींविरुध्द कर्जे देऊ शकत नाहीत ह्या शिवाय त्या त्यांच्या स्वतःच्याच सीडींची पुनर्खरेदी करु शकत नाहीत. तथापि, एका वेगळ्या अधिसूचनेद्वारे आरबीआय, तात्पुरत्या कालासाठी हे निर्बंध शिथिल करु शकते.

### १२. सीडींचा नमुना (फॉरमॅट)

बँका/वित्तसंस्थांनी सीडी केवळ डिमॅट स्वरुपात द्याव्यात तथापि, डिपॉझिट्स अधिनियम १९९६ अनुसार, प्रत्यक्ष स्वरुपात प्रमाणपत्र मिळविण्याचा अधिकार गुंतवणुकदारांना आहे. त्यानुसार एखाद्या गुंतवणुकदाराने प्रत्यक्ष स्वरुपातील प्रमाणपत्राचा आग्रह धरल्यास, त्या बँकेने/वित्तसंस्थेने, मुख्य महाव्यवस्थापक, वित्तीय बाजार विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, फोर्ट मुंबई - ४००००१ ह्यांना, अशा बाबतीत वेगळे कळवावे. ह्याशिवाय सीडी देण्यावर मुद्रांकमूल्य लागु आहे. बँका/वित्तसंस्थांनी अंगिकार करण्यासाठी एक नमुना (जोडपत्र १) मध्ये दिला आहे. सीडींची परतफेड करण्यासाठी कोणताही सवलत काल नसेल. परिपक्वतेच्या तारखेस सुट्टी असल्यास, प्रचालक बँका/वित्तसंस्थांनी त्याच्या आदल्या दिवशी प्रदान करावे. ह्यासाठी, डिस्काउंट/व्याजदराची हानी टाळण्यासाठी, परिपक्वतेची तारीख रजेच्या दिवशी येणार नाही अशा रितीने बँका/वित्तसंस्थांनी ठेवींचा काल ठरवावा.

### १३. सिक्युरिटीचा विचार

प्रत्यक्ष स्वरुपातील सीडी ह्या सही व डिलीव्हरी करुन हस्तांतरित करता येत असल्याने, बँकांनी, प्रमाणपत्रे चांगल्या दर्जाच्या सिक्युरिटी कागदावर छापण्याची व्त्यावर खाडाखोड केली जाण्याविरुध्द काळजी घ्यावी. त्यावर दोन किंवा अधिक अधिकाऱ्यांच्या सह्या असाव्यात.

### १४. प्रमाणपत्रांबाबत प्रदान

१४.१ सीडीज् हस्तांतरणीय असल्याने, प्रत्यक्ष स्वरुपातील प्रमाणपत्रे, त्यांच्या शेवटच्या धारकावारे प्रदानासाठी सादर केली जाऊ शकतात. त्यावरील सह्यांच्या साखळीमध्ये काही दोष असल्यास, त्याबाबतच्या जबाबदारीसंबंधाने प्रश्न उद्‌भवू शकतात. ह्यासाठी बँकांनी आवश्यक ती खबरदारी घेऊन केवळ क्रॉस केलेल्या चेकनेच प्रदान करावे. ह्या सीडींमध्ये व्यवसाय करणारांनाही ह्याबाबत सावधान केले जावे. डिलिट डिलिट डिलिट

१४.२ डिमॅट केलेल्या सीडींचे धारक, त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी सभागींकडे (डीपी) जातील आणि विशिष्ट अशा इंटरनॅशनल सिक्युरिटीज् आयडेंटिफिकेशन नंबर (आयएसआयएन) ओळखली जाणारी सिक्युरिटी, हस्तांतरित करण्यासाठी/देण्यासाठी, त्याच्या प्रचालकाने ठेवलेल्या 'सीडी रिडेम्शन अकाउंट' कडे सूचना देतील. धारकांनी त्यांच्या डीपीला दिलेल्या डिलीव्हरी-सूचनांची एक प्रत, जोडून, तो धारक,

प्रचालकाला पत्र/फॅक्सद्वारे कळवील आणि त्वरित प्रदान मिळण्यासाठी ते पाठविण्याची जागा/ठिकाण कळवील. ‘सीडी रिडेम्शन अकाउंट’ मध्ये, सीडीचे डिमॅट क्रेडीट मिळाल्यावर, तो प्रचालक, परिपक्वतेच्या तारखेस, बँकर्स चेकद्वारा, धारक/हस्तांतरकर्ता ह्यांना पनुर्प्रदान करण्याची व्यवस्था करील. डिलिट डिलिट

**१५. बदली प्रमाणपत्रे देणे**

१५.१ प्रत्यक्ष प्रमाणपत्रे हरविल्यास, पुढील अनुपालन केल्यावर बदली प्रमाणपत्रे दिली जाऊ शकतात :

अ. किमान एका स्थानिक वृत्तपत्रात नोटिस देणे आवश्यक आहे.

ब. ह्या नोटिशीच्या तारखेपासून वाजवी काल (१५ दिवस) गेले असले पाहिजेत ; आणि

क. त्या सीडीच्या प्रचालकाने समाधान होईल असा इंडोमिनिट्य बाड गुंतवणुकदाराने केला असला पाहिजे.

१५.२ बदली प्रमाणपत्र केवळ प्रत्यक्ष स्वरुपातच दिले जावे. पुनश्च मुद्रांकची आवश्यकता नाही कारण मूळ व हरविलेल्या प्रमाणपत्राच्या मदल्यात ते दिले जात आहे. ह्या बदली सीडीवर स्पष्टपणे, ते प्रमानपत्र बदली असयाचे व त्याची मूळ किंमत ड्यु तारीख व दिल्याची तारीख (बदली प्रमाणपत्र -------- रोजी देण्यात आले) निर्देशित केली जावी.   डिलिट डिलिट

**१६. लेखासंबंधाने**

बँका/वित्तसंस्था प्रचालनाची किंमत 'सीडी इश्युड' ह्या शीर्षकाखाली लेखामध्ये ठेवून ठेवीखाली दाखवू शकतात.डिस्काउंटसंबंधीच्या लेखा नोंदी मात्र 'रोख प्रमाणपत्रे' प्रमाणेच केल्या जातील. बँका/वित्तसंस्थांनी संपूर्ण तपशीलासह दिलेल्या सीडीचे एक रजिस्टर तयार करावे. डिलिट डिलिट

**१७. प्रामाणित बाजार कार्यरीती व कागदपत्रे ठेवणे**

फिक्सड् इनकम मनी मार्केट अँड डेरिवेटिवज् असोशिएशन ऑफ इंडिया (एफआयएमएमडीए) सीडी मार्केटच्या कार्यकरी लवचिकतेसाठी व सुरळीतपणे चालण्यासाठी, आरबीआयचा सल्ला घेऊन, आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम कार्यरीतींना अनुसरुन, त्याबाजारात भाग घेणारांनी पालन करण्यासाठी, कोणत्याही प्रमाणित कार्यरीती व कागदपत्रे विहित करु शकते. ह्याबाबत, एफआयएमएमडीएने जून २०, २००२ रोजी दिलेल्या व वेळोवेळी सुधारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा संदर्भ बँका/वित्तसंस्थांनी घ्यावा. http://fimmda.org

**१८. अहवाल पाठवणे**

१८.१ आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४२ खाली, बँकांनी सीडींची रक्कम पाक्षिक अहवालात

समाविष्ट करावी आणि ह्या अहवालातील तळटीपेमध्ये अशी समाविष्ट केलेली रक्कम वेगळी निर्देशित करावी.

१८.२ ह्याशिवाय, बँका/वित्तसंस्थांनी पधरवड्याची अखेर झाल्याच्या १० दिवसांच्या आत, जोडपत्र २ मध्ये दिलेल्या नमुन्यात, पाक्षिक अहवाल, मुख्य महाव्यवस्थापक, वित्तीय बाजार विभाग, आरबीआय, केंद्रीय कार्यालय बिल्डिंग, फोर्ट मुंबई - ४००००१ ह्यांचे कडे सादर करावा. फॅक्स ९१-२२-२२६३०९८१ / २२६३४८२४. ह्याशिवाय, त्या पंधरवड्याच्या अखेर झाल्याच्या १० दिवसांच्या आत बँकांनी, ईमेलद्वारे एमएस एक्सेल/सीएसची फाईलमध्ये, ह्या महापरिपत्रकात जोडपत्र - ३ मध्ये दिलेल्या नमुन्यात आवश्यक ती माहिती पाठविणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष स्वरुपात/इमेलद्वारा कळविलेल्या सीडींच्या प्रचालनाची माहिती, त्याच वेळी, ऑनलाईन रिटर्न्स फायलिंग सिस्टिम खाली (ओआरएफएस) वेब-आधारित मॉड्युलवर सादर करण्यात यावी.

**जोडपत्र १**

(परिच्छेद १२ पहा)

## निगोशिएबल ठेव-प्रमाणपत्राचा (सीडी) नमुना

बँक/संस्थेचे नाव

क्र.

रू -------------

दिनांक  ------------

## निगोशिएबल ठेव प्रमाणपत्र

ह्याच्या तारखेपासून --------- महिन्या/दिवसांनंतर, ---------- येथे असलेली (जागेचे नाव), ---------- (बँक/संस्थेचे नाव), येथे, --------- ह्यांना (ठेवीदाराचे नाव) किंवा त्यांच्या आदेशाला, हा संलेख सादर केल्यावर, मिळालेल्या ठेवीसाठी रुपये ----------, ----------- (शब्दात) एवढी रक्कम देण्याचे वचन देत आहेत.

करिता --------- (संस्थेचे नाव) ---------

परिपक्वतेची तारीख (सवलतीचे दिवस सोडून)

| **सूचना** | **एंडॉर्समेंट्स** | **तारखा** |
|---|---|---|
| १ | १ | |
| | २ | |
| | ३ | |
| | ४ | |
| | ५ | |
| | ६ | |

**जोडपत्र २**
(परिच्छेद१
८.२ पहा)

**ठेव प्रमाणपत्रावरील सीडी पाक्षिक अहवाल**
**(एसएफआर ३ -डी)**

बँक/संस्थाचे नाव

रोजी संपलेल्या पधरवड्यासाठी

**<u>ठेव प्रमाणपत्र (सीडी) देणे</u>**

**पंधरवड्याच्या अखेरीस येणे असलेल्या सीडींची रक्कम**

(१) डिस्काउंट मूल्य धर्तीवर (रु - कोटी)

| | |
|---|---|
| दर्शनी मूल्य | |
| डिस्काउंट केलेले मूल्य | |

(२) कूपन बॅरिंग धर्तीवर (रु - कोटी)

| | |
|---|---|
| दर्शनी मूल्य | |

**पंधरवड्यात दिल्या गेलेल्या सीडींचा तपशील**

**१ <u>डिस्काउंट मूल्य धर्तीवर दिलेल्या सीडी</u>**

| अन क्रमांक | दिलेल्या सीडींचे डिस्काउंट केलेले मूल्य (रुपयांमध्ये ) | परिपक्वता काल दिवसांमध्ये | परिणामकारक/लागु व्याजदर (दरसाल दर शेकडा) | दिलेल्या डिमॅट किंवा प्रत्यक्ष सीडी(डी/पी) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

२ तरत्या दराच्या धर्तीवर दिलेल्या सीडी

| अनु क्र. | दिलेल्या सीडींचे दर्शनी केलेले मूल्य (रुपयांमध्य) | परिपक्वता काल (दिवसांमध्ये) | बेंचमार्क | स्प्रेड |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

**जोडपत्र ३**

**व्याख्या**

अन्य संदर्भ नसल्यास ह्या मार्गदर्शक तत्वांमध्येः

अ) ‘बँक’ किंवा ‘बँकिंग कंपनी’ म्हणजे, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा१०) च्या कलम ५ च्या खंड (सी) मध्ये व्याख्या केलेली बँकिंग कंपनी किंवा त्याच्या खंड (डीए) , खंड (एनसी) आणि खंड (एनडी) मध्ये अनुक्रमे, ‘कॉरेस्पॉंडिग न्यू बँक’, ‘भारतीय स्टेट बँक’ किंवा ’सहाय्यक/दुय्यम बँक’ आणि त्यात, त्या अधिनियमाच्या कलम ५६ सह वाचित, कलम ५ च्या खंड (डीए) मध्ये व्याख्या केलेली ‘सहकारी बँक’ ही समाविष्ट आहे.

ब) ‘अनुसूचित बँक’ म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या दुसऱ्या शेड्युलमध्ये समाविष्ट असलेली बँक.

क) ‘अखिल भारतीय वित्तीय संस्था (एफआय)’ म्हणजे, ह्या महापरिपत्रकाच्या परिच्छेद ६.२ मध्ये विहित केलेल्या अंब्रेल लिमिटमध्ये, लागु असेल त्याप्रमाणे, टर्म मनी, मुदत ठेवी, ठेवीप्रमाणपत्रे, कमर्शियल पेपर, आणि आंतरकॉर्पोरेट ठेवींच्या माध्यमातून स्त्रोत उभे करण्यास, रिझर्व बँकेने खास परवानगी दिलेल्या वित्तीय संस्था.

ई) ‘कॉर्पोरेट’ किंवा ‘कंपनी’ म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या ४५ आय (एए) मध्ये व्याख्या केलेली कंपनी परंतु सध्या जारी असलेल्या कोणत्याही कायद्याखाली गुंडाळल्या जात असलेल्या कंपनीचा ह्यात समावेश नाही.

फ) ‘अबँकीय कंपनी’ म्हणाजे, बँकिंग कंपनी सोडून अन्य कंपनी.

ग) ‘अबँकीय वित्तीय कंपनी’ म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४५ आय(एफ मध्ये व्याख्या केलेली कंपनी.

ज) येथे वापरण्यात आलेले आणि भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दसमूह ह्यांचा अर्थ, त्यांना ह्या अधिनियमात दिल्या गेलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

महापरिपत्रक - ठेवींची
प्रमाणपत्रे देण्यावरील
मार्गदर्शक तत्वे
(सीडी)-जुलै १, २०११

**परिशिष्ट**

## एकत्रित परिपत्रकाची यादी

| अनु. क्र. | संदर्भ क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१३४/६५-८९ | जुन ६१९८९ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| २ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.११२/६५-९० | मे २३, १९९० | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| ३ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.६०/६५-९० | डिसेंबर२०, १९९० | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| ४ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.११३/६५-९१ | एप्रिल १५१९९१ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| ५ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.८३/६५-९२ | फेब्रुवारी१२, १९९२ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| ६ | डीबीओडी.क्र.बीसी.११९/१२.०२१.००१/९२ | एप्रिल २१, १९९२ | आरबीआय अधिनियम, १९३४ चे कलम ४२ (१) रोख राखीव निधी. |
| ७ | डीबीओडी.क्र.बीसी.१०६/२१.०३.०५३/९३ | एप्रिल ७, १९९३ - | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) - मर्यादा वाढवणे |
| ८ | डीबीओडी.क्र.बीसी.१७१/२१.०३.०५३/९३ | ऑक्टोबर ११, १९९३ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी)ची योजना |
| ९ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१०९./२१.०३.०५३/९६ | ऑगस्ट ९, १९९६ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी)ची योजना |
| १० | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.४९/२१.०३.०५३/९७ | एप्रिल २२, १९९७ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| ११ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१२८/२१.०३.०५३/९७ | ऑक्टोबर २१, १९९७ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| १२ | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.९६/१३.०३.००/२००१-०२ | एप्रिल २९, २००२ | डिमॅट स्वरुपात ठेवींची प्रमाणपत्रे देण्याचा प्रश्न |
| १३ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.११५/२१.०३.०५३/२००१-०२ | जुन १५, २००२ | ठेवींचे प्रमाणपत्रे (सीडी) |
| १४ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.४३/२१.०३.०५३/२००२-०३ | नोव्हेंबर१६, २००२ | २००२-०३ च्या नाणे विषयक व कर्जविषयक धोरणाचा मध्यमुदत आढावा -ठेवीचे प्रमाणपत्र |
| १५ | एमपीडी.क्र.२५४/०७.०१.२७९/२००४-०५ | जुलै १२, २००४ | ठेवींची प्रमाणपत्रे देण्यावरील मार्गदर्शक तत्वे |
| १६ | एमपीडी.क्र.२६३/०७.०१.२७९/२००४-०५ | एप्रिल २८२००५ | ठेवींचे प्रमाणपत्रे |
| १७ | एफएमडी.एमएसआरजी.क्र.२०६३/०२.०८.००३/२००९-१० | फेब्रुवारी २५, २०१० | ठेवींचे प्रमाणपत्र दिल्याचे कळविणे |
| १८ | एफएमडी.एमएसआरजी.क्र.२९०५/०२.०८.००३/२००९-१० | जुन १७, २०१० | ठेवींचे प्रमाणपत्र दिल्याचे कळविणे - ऑनलाईन रिट्र्न फाईल करण्याची प्रणाली |
| १९ | ऐडीएमडी.डीओडी.११/११.०८.३६/२००९-१० | जुन ३०, २०१० | सीडी व कमर्शियल पेपर्स (सीपी) मधील ओटीसी वाणिज्य व्यवहार कळविणे |